Agrowon Dt. 28/11/2011

# 'जीआय'साठी साडेचार हजार प्रमाणपत्रांना मंजुरी

## शेतकऱ्यांना शेतीमालाच्या ब्रॅण्डिंगसाठी होणार उपयोग

विनोद इंगोले : ॲग्रोवन वृत्तसेवा

**नागपूर : भौगोलिक निर्देशांक (जीआय) मिळालेल्या पीकवाणांची लागवड, विक्री करणे सुलभ व्हावे याकरिता आवश्यक प्रमाणपत्राकरिता शेतकऱ्यांना वैयक्तिक नोंदणी करावी लागते. त्या पार्श्वभूमीवर राज्य फलोत्पादन विभागाकडून व्यापक मोहीम हाती आली. त्याअंतर्गत सुमारे ७००० अर्ज चेन्नई येथील भौगोलिक निर्देशांक संचालनालयाकडे पाठविण्यात आले. त्यापैकी ४५०० शेतकऱ्यांना नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले आहेत, अशी माहिती निर्यात सल्लागार गोविंद हांडे यांनी दिली.**

भौगोलिक निर्देशांक (जीआय) वापराकरिता शेतकऱ्यांना नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक असते. याकरिता चेन्नईस्थित संस्थेकडे देशभरातून नऊ हजार अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी एकट्या महाराष्ट्रातून सुमारे ७००० अर्ज आहेत. यात सर्वाधिक नोंदणी अर्ज हे आंबा, डाळिंब आदींचे आहेत. माती, भौगोलिक वातावरण, तसेच इतर अनेक नैसर्गिक बाबी संबंधित पीक उत्पादनात महत्त्वाच्या ठरतात. पान ४ वर »

> “ भौगोलिक निर्देशांक असलेल्या शेतीमालाचे उत्पादन घेण्यासाठी त्या क्षेत्रातील शेतकऱ्यांना वैयक्तिक नोंदणीची गरज राहते. त्याकरिता नाममात्र दहा रुपये शुल्क आकारले जाते. नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यांत यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे प्रस्तावित आहे. सध्या ७००० पैकी ४५०० नोंदणी प्रमाणपत्रांना मंजुरी मिळाली आहे.
>
> – **गोविंद हांडे,** निर्यात सल्लागार, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन अभियान, पुणे

**भौगोलिक निर्देशांक (जीआय)**

**दृष्टिक्षेपात नोंदणी प्रमाणपत्र...**

- संबंधित पिकाकरिता असलेल्या भौगोलिक मानांकनाचा त्या क्षेत्रातील शेतकऱ्यांना उत्पादन, विक्रीकरिता लाभ घेता येतो
- जीआय नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त शेतकऱ्यांना स्वत: अथवा, त्यांचे उत्पादन विक्री करणाऱ्या संस्थांना १० वर्षांकरिता वापरता येते
- ज्या संस्थांनी संबंधित पिकाकरिता जीआय मिळविला केली आहे, त्या संस्था लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना नोंदणीस मदत करतात

# 'जीआय'साठी साडेचार हजार प्रमाणपत्रांना मंजुरी

» पान १ वरून

नागपुरी संत्रा सातपुड्याच्या पायथ्याशी चांगला रुजतो. त्यांचा रंग, आकार आणि दर्जाही राज्याच्या इतर भागांच्या तुलनेत सुधारित असतो. त्यामुळेच मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या काही भागांत घेतल्या जाणाऱ्या या संत्र्याला जीआय मिळाला आहे. याचे स्वामित्व अधिकार डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाकडे आहेत. याच धर्तीवर राज्यात आजवर सुमारे २६ वाण, उत्पादनांना जीआय प्राप्त झाले आहे. त्यात नव्याने ठाणे जिल्ह्यातील वाडा कोलम तांदूळ, भंडारा जिल्ह्यातील भंडारा चिन्नोर, तसेच अलिबागच्या पांढऱ्या कांद्याची भर पडली आहे. 'जीआय' नोंदणीकरिता संबंधित उत्पादन घेतल्या जाणाऱ्या भागाचा नकाशा काढावा लागतो. जो नकाशा प्रमाणित झाला आहे त्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना अशा शेतीमालाचे उत्पादन घ्यावयाचे झाल्यास त्यांना त्याकरिता चेन्नई कार्यालयाकडे रीतसर नोंदणी करावी लागते. मात्र शेतकऱ्यांमध्ये याविषयी जागृती नसल्याने त्याकरिता वनौषधी व पणन मंडळाकडून पुढाकार घेण्यात आला आहे. त्या अंतर्गत तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत वैयक्तिक नोंदणीचे ७००० अर्ज शेतकऱ्यांकडून भरून घेत ते चेन्नई कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत.

Agrowon Dt. 28/11/2022

# सोयाबीन तारण कर्ज घेण्यावर शेतकऱ्यांचा भर

## अमरावती बाजार समितीतर्फे ३४ कोटी कर्ज वितरण

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

अमरावती : सोयाबीनचे दर पाच हजार रुपयांवर स्थिरावल्याने येत्या काळात दरवाढ होईल यापेक्षा शेतकरी आपला शेतीमाल तारण ठेवण्यावर भर देत आहेत. अमरावती बाजार समितीने तब्बल ३४ कोटी रुपयांचे वाटप तारणापोटी वाटप केले आहे.

विदर्भातील बाजार समित्यांमध्ये सध्या सोयाबीनची आवक मंदावली आहे. येत्या काळात सोयाबीनच्या दरात तेजी येईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. त्याच



कारणामुळे शेतकरी सोयाबीन विकण्याऐवजी गरजेपुरता पैसा उपलब्ध करून घेण्यासाठी सोयाबीन तारण ठेवण्यावर भर देत आहेत.

पान ४ वर »

### १८० दिवसांपर्यंत तीन टक्के व्याज आकारणी

शेतीमाला तारण योजनेत शेतकरी सोयाबीन, तूर व हरभरा तारण ठेवू शकतात. यावर १८० दिवसांपर्यंत तीन टक्के व त्यानंतर वार्षिक सहा टक्के व्याजाची आकारणी बाजार समितीद्वारे केली जाते.

# सोयाबीन तारण कर्ज घेण्यावर शेतकऱ्यांचा भर

**» पान १ वरून**

विदर्भातील सर्वच बाजार समित्यांमध्ये ही स्थिती असल्याचे व्यापारी सूत्रांनी सांगितले.

वाशीम जिल्ह्यातील कारंजा बाजार समितीमध्ये हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांनी सोयाबीन तारण ठेवण्यावर भर दिला. त्यामुळे बाजार समितीचे सर्व गोदाम हाउसफुल झाले आहेत. तब्बल वीस हजार क्विंटल सोयाबीन शेतकऱ्यांनी तारण ठेवले आहे. अमरावती बाजार समितीमध्ये देखील शेतकऱ्यांनी सोयाबीन तारण ठेवत ३४ कोटींची उचल केली आहे.

अकोला, वाशीम, वर्धा या बाजार समितीमध्यें देखील शेतकऱ्यांनी शेतीमाल तारण ठेवण्यावरच भर दिला आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या योजनेत मूग, हरभरा, सोयाबीन, तूर, सूर्यफूल, करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, हरभरा हा शेतीमाल तारण ठेवता येतो.

Agrowon Dt. 24/11/2022

# बाजार समिती अधिनियम दुरुस्तीला राज्यपालांची मंजुरी

### शेतकऱ्यांना निवडणूक लढविण्याची मुभा; उपमुख्यमंत्री कार्यालयाची लगबग

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

**मुंबई :** बाजार समित्यांच्या निवडणुकांमध्ये शेतकऱ्यांना निवडणूक लढविण्याची मुभा देणाऱ्या अधिनियम दुरुस्तीला राज्यपालांनी मंगळवारी (ता. २२) रात्री मंजुरी दिली. मागील आठवड्यात मंत्रिमंडळाने महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन अधिनियम १९६३ च्या कलम १३च्या दुरुस्तीचा निर्णय घेतला होता.

तत्पूर्वी मंत्रिमंडळाने राज्यातील पात्र शेतकऱ्यांना बाजार समितींच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार देणारी अधिनियम दुरुस्तीस मान्यता दिली होती. मात्र अजूनही हा निर्णय बासनात गुंडाळून ठेवला आहे. वाढता खर्च आणि शिंदे गटाचा विरोध यामुळे अजूनही ही अधिनियम दुरुस्तीची फाइल मुख्यमंत्री कार्यालयात पडून आहे.

राज्यातील ३०६ बाजार समित्यांपैकी २८१ बाजार समित्यांची मुदत संपल्याने



निवडणूक प्रक्रिया सुरू करणे अपेक्षित होते. मात्र निवडणूक प्राधिकरणाने मुंबई उच्च न्यायालयात निवडणुका पुढे ढकलण्याबाबत विनंती अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे बाजार समित्यांचे त्रांगडे वाढले आहे.

बाजार समित्या आणि सहकारी सोसायट्यांमध्ये असलेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्चस्वाला शह देणे हा एककलमी कार्यक्रम भाजपने आखला आहे. त्यामुळे पणन खाते मुख्यमंत्र्यांकडे असले तरी शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार

**व्यापारी, दलालांच्या घुसखोरीची भीती**

*शेतकऱ्यांना निवडणूक लढविण्यास मुभा या नावाखाली अधिनियम दुरुस्ती केली असली तरी बाजार समित्यांवर अप्रत्यक्ष ताबा असणारे व्यापारी, दलाल आणि मोठ्या राजकारण्यांना मोकळे रान मिळाले आहे. केवळ १० गुंठे जमीन असणे बंधनकारक असल्याने ही साधी अट कुणीही पूर्ण करू शकते.*

देणे आणि शेतकऱ्यांना बाजार समितीच्या निवडणुकीत निवडणूक लढविण्याची मुभा देणारी अधिनियम दुरुस्तीस मान्यता देणे यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आग्रही होते.

**पान ४ वर »**

# बाजार समिती अधिनियम दुरुस्तीला राज्यपालांची मंजुरी

**» पान १ वरून**

सहकार आणि पणन क्षेत्रात भाजपला काहीही करून जाळे विस्तारायचे असल्याने सोयीची दुरुस्ती केली जात असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देणारी अधिनियम दुरुस्ती केली. मात्र प्रशासनाने १२ बाजार समित्यांच्या निवडणूक खर्चाची आकडेवारी सादर केली. अशा प्रकारे पाच ते सहा पट निवडणूक खर्च वाढत असेल, तर तोट्यात असलेल्या बाजार समित्या अजून गाळात जातील, असे सांगून प्रशासनाने अशा प्रकारे निवडणुका घेणे चुकीचे असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर हा निर्णय मागे पडला. त्यानंतर यातून खुष्कीचा मार्ग काढून शेतकऱ्यांना उमेदवारी देणारी अधिनियम दुरुस्ती आणण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. पणन खाते असलेल्या मुख्यमंत्र्यांनीही याला मूकसंमती दिली. मात्र प्रशासनाने या निर्णयातील धोके लक्षात आणून देऊनही फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत अधिकाऱ्यांना न जुमानता एकमताने हा निर्णय मंजूर करून घेतला. गुरुवारी बैठक झाल्यानंतर तातडीने या दुरुस्तीवर राज्यपालांची सही व्हावी यासाठी फडणवीस आग्रही होते. मंगळवारी दुपारपासून उपमुख्यमंत्री कार्यालयातून पणन विभागाच्या अधिकाऱ्यांना सतत फोन येत होते. संबंधित फाइल राजभवनावर कोणत्या अधिकाऱ्याकडे गेली. ती कोण घेऊन गेले आदी माहिती घेतली जात होती. सायंकाळी ही फाइल राजभवनावर गेली. त्यानंतर दोन तासांत या फाइलवर सही झाली आणि अधिनियम दुरुस्ती झाली.

संमिश्र

Agrowon Dt. 21/11/2022

# गंगापूर बाजार समितीचे ॲप

## शेतकऱ्यांना शेतीमालाचे भाव समजण्याचा मार्ग सुकर

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

गंगापूर, जि. औरंगाबाद : पारंपरिक व्यवस्थेतून बाहेर पडत गंगापूर कृषी उत्पन्न बाजार समिती पन्नास वर्षांनंतर डिजिटल झाली आहे. बाजार समितीने शेतकऱ्यांना शेतीमालाचे भाव समजण्याचा मार्ग सुकर करण्यासाठी मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसे करणारी बहुधा जिल्ह्यातील पहिलीच बाजार समिती असावी. मुख्य प्रशासक ऋषिकेश पाटील यांनी यासाठी पुढाकार घेतला असून, संपूर्ण व्यवहारच संगणकीकृत झाला आहे.

गंगापूर बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात तालुक्यातील १८३ गावांचा समावेश आहे. १० हजारांवर शेतकऱ्यांनी बाजार समितीचे ॲप मोबाईलमध्ये घेतले आहे. या ॲपमुळे संगणकीकरणामध्ये प्रत्येक वाहनांमधील शेतीमालाची प्रवेशद्वारावर संगणकीकृत नोंद होत आहे. खुल्या पद्धतीचा लिलाव होऊन प्रत्येक शेतीमालाचे डाग कोणत्या अडत्याच्या गाळ्यावर आले आहेत, याची नोंद होऊन त्याचा संदेश मोबाईलवर पाठविण्यात येत आहे. तसेच शेतीमालाची विक्री झाल्यावर जावक गेटवरच त्याची नोंद होऊन, बाजारशुल्क (सेस) ग्राहकांकडून प्रवेशशुल्कांची आकारणी केली जात आहे. यामुळे वर्षाच्या शेवटी होणारी बाजार शुल्काची रक्कम दररोज बाजार समितीला मिळत आहे. तसेच प्रत्येक शेतीमालाचे दर तासाला किती दराने विक्री होत आहे. याचे दर बाजार समितीच्या वेबसाइटवर लाइव्ह दिसत आहेत. यामुळे राज्य आणि देशपातळीवर शेतकऱ्यांना शेअर बाजाराप्रमाणे प्रत्येक शेतीमालाच्या दरातील चढ-उतार कळत आहेत. याचा फायदा शेतकरी, अडते, खरेदीदार, व्यापारी आणि बाजार समितीला होत आहे.

> **“ ॲपमुळे शेअर मार्केट प्रमाणेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे भाव समजतात. ॲप शेतकऱ्यांना पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे शेतीमालाचा बांध ते ग्राहक असा प्रवास संगणकीकृत झाला आहे. या माध्यमातूनच लिलावाची संपूर्ण माहिती शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे देण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिकाधिक पारदर्शी सेवा मिळत आहे. सर्व घटकांच्या समन्वयाने आणि विश्वासात घेऊन हे केले आहे.**
>
> **- ऋषिकेश पाटील**
> मुख्य प्रशासक, गंगापूर बाजार समिती



Agrowon Dt. 18/11/2022

# बाजार समितीत शेतकऱ्यांना उमेदवारी

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय; १० गुंठे शेतीची अट



### तत्काळ अध्यादेश काढण्याच्या हालचाली

शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देणारा अध्यादेश अद्याप निघाला नसला तरी शेतकऱ्यांना निवडणूक लढविण्याची मुभा देणारा अध्यादेश तत्काळ काढण्याच्या हालचाली गुरुवारीच सुरू झाल्या. अधिनियम दुरुस्तीचा निर्णय मुख्यमंत्री कार्यालयातून राज्यपाल कार्यालयाला शुक्रवारी (ता. १८) पाठवून त्याचा अध्यादेश काढण्यासाठी पाठविण्यात येणार आहे.

ॲग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना निवडणूक लढविण्याचा अधिकार देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत गुरुवारी (ता. १७) घेण्यात आला.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. काही महिन्यांपूर्वी शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय सध्या थंड बस्त्यात असला तरी उमेदवारी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीवर सेवा संस्था, बहुउद्देशीय सहकारी संस्था सदस्यांकडून ११ आणि ग्रामपंचायत सदस्यांकडून चार असे १५ सदस्य शेतकरी प्रतिनिधी निवडले जातात. प्रचलित नियमानुसार बाजार समितीवर सदस्य म्हणून ज्या शेतकऱ्यांची नावे मतदार यादीत असतील असेच शेतकरी निवडणुकीसाठी पात्र ठरत होते. त्यामुळे शेतकऱ्यांना बाजार समित्यांवर मर्यादित प्रतिनिधित्व मिळत होते. सर्व शेतकऱ्यांना बाजार समितीच्या निवडणुकीला उभे राहण्याची २००८ पूर्वी मुभा होती. मात्र २२ जानेवारी २००८ मध्ये अधिनियम दुरुस्ती करून बाजार समिती क्षेत्रामध्ये राहणारा प्रत्येक शेतकरी समितीची निवडणूक लढविण्यात पात्र आहे. तथापि, संबंधित मतदार संघाच्या मतदार यादीत ज्याचे नाव असेल असेच शेतकरी निवडणूक लढविण्यास पात्र असतील, अशी दुरुस्ती करण्यात आली होती. त्यानंतर २०१८ मध्ये भाजप सरकारने या अधिनियमात दुरुस्ती करून मतदानाचा आणि निवडणूक लढविण्याचा अधिकार देण्यात आला.

पान ४ वर »

# बाजार समितीत शेतकऱ्यांना उमेदवारी

» पान १ वरून

२०२० मध्ये महाविकास आघाडी सरकारने २०१८ पूर्वीच्या रचनेप्रमाणे निवडणुका घेण्याचा निर्णय घेत सेवा संस्था, ग्रामपंचायत सदस्यांमधून बाजार समिती सदस्य निवडीची रचना आणली.

मात्र ग्रामपंचायती, सेवा संस्था आणि बहुउद्देशीय संस्थांतील एकहाती राजकीय वर्चस्वाला शह देण्यासाठी आता शिंदे-भाजप सरकारने शेतकऱ्यांना निवडणुकीत उमेदवार होण्याचा मार्ग मोकळा करून दिला आहे. त्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन अधिनियम १९६३ मधील कलम १३ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासाठी बाजार समिती क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आणि कमीत कमी १० गुंठे शेती असलेल्या शेतकऱ्याला मतदानाचा अधिकार देण्याचा निर्णय राज्य सरकारने जुलै महिन्यात घेतला होता. मात्र, या निर्णयाचा अध्यादेश न निघाल्याने हा निर्णय लटकला आहे. या अधिनियम दुरुस्तीतील पोटकलमात दुरुस्ती करून आता शेतकऱ्यांना थेट निवडणूक लढण्याची मुभा दिली आहे. संचालक मंडळाची रचना पूर्वीप्रमाणेच असेल. संचालक मंडळात १५ सदस्य असतील, त्यात दोन महिला, एक इतर मागासवर्गीय व्यक्ती, एक विमुक्त जातीतील आणि भटक्या जमातीतील व्यक्ती, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीतील व्यक्तीला प्रतिनिधित्व करता येणार आहे.

औरंगाबाद, शुक्रवार, १८ नोव्हेंबर २०२२
सकाळ अॅग्रोवन

# सेलू बाजार समितीतर्फे शेतीमाल तारण योजना सुरु

**परभणी** : सेलू कृषी उत्पन्न बाजार समिती तर्फे २०२२-२३ हंगामातील उत्पादित शेतमालावर शेतमाल तारण कर्ज योजना सुरु करण्यात आली आहे. अल्प व्याजदरात सुलभ कर्ज योजना सुरू करण्यात आली असून या योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे, आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य प्रशासक एस.व्ही.अब्दागिरे यांनी केले आहे.

शेतकऱ्यांचा शेतमाल सुरक्षित राहावा व त्या मालास योग्य भाव आल्यानंतर विक्री करता यावा यासाठी या कार्यालयाने कृषी पणन मंडळ महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मार्फत शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत वखार महामंडळाच्या गोदामामध्ये शेतकऱ्यांनी सोयाबीन, तूर, मूग, उडीद, हरभरा हा शेतमाल ठेवल्यास वजन काट्यावरील वजन पावतीवर एकूण वजनाचे त्या दिवसाचे बाजारभाव किंवा हमीभावानुसार जो दर कमी असेल त्या दराने एकूण वजनावरील किमतीवर ७५ टक्के रक्कम कर्ज स्वरूपात ६ टक्के व्याज दराने एकूण १८० दिवसांसाठी दिले जाईल. २०२१-२२ मध्ये शेतमाल तारण योजने अंतर्गत बाजार समिती कार्यक्षेत्रातील ४० शेतकऱ्यांना ५८ लाख २१ हजार ८८० रुपये कर्ज वाटप करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी शेतमाल तारण कर्ज योजनेसाठी अद्ययावत सातबारा, पिकपेरा उतारा, आधारकार्ड, शंभर रुपयाचा स्टॅम्प पेपर, वखार महामंडळाची पावती इत्यादी कागदपत्रासह कृषी उत्पन्न बाजार समितीकडे अर्ज करावा. या योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा.

# हापूसबरोबर इतर जातींची वाढवा निर्यात



डॉ. नागेश टेकाळे
९८६९६१२५३१

**देशात एक हजार पेक्षाही जास्त प्रकारच्या आंब्यांच्या जाती आहेत. त्यातील फक्त ३० जातींनाच व्यापारी महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यातील ५० टक्क्यांपेक्षाही जास्त हिस्सा एकट्या हापूसचा आहे. हापूस पाठोपाठ इतरही आंबा जातींची निर्यात वाढविण्यावर भर द्यायला हवा.**

मागील जून महिन्यात झारखंड या आदिवासीबहूल राज्याला 'नाबार्ड'च्या माध्यमाने भेट देण्याची संधी मिळाली. झारखंड येथील गरीब, अल्पभूधारक आदिवासी शेतकऱ्यांनी केशर, आम्रपाली, चौसा, दशहरा या विविध आंबा उत्पादनात केलेली प्रगती पाहून डोळे दिपून गेले. केवळ मॉन्सूनमध्येच शेती आणि नंतर पुढचे दोन ऋतू केवळ जंगलावर उपजीविका करणारा हा पूर्ण उपेक्षित शेतकरी आज नाबार्डच्या साह्याने आंबा उत्पादनात यशाचे मनोरे रचत आहे. विशेष म्हणजे त्यांचे आंबा उत्पादन स्थानिक पातळीवरच विक्री होते, दिल्ली, कोलकाता स्थित व्यापारी आंब्याच्या बागेत येऊन आंबा खरेदी करतात. त्यातून मिळणाऱ्या चार पैशात तेथील गरीब शेतकरी मला जास्त सुखी आणि आनंदी वाटला. त्यांचा हा उत्कृष्ट दर्जाचा आंबा निर्यात झाला तर हा समाज अजून जास्त आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकणार नाही काय?

जगामधील ५० टक्के आंबा उत्पादन भारतात होते. मात्र आंबा निर्यातीमध्ये थायलंड, मेक्सिको, नेदरलँड, पेरू आणि ब्राझील भारतापेक्षा खूपच पुढे आहेत. आपला समज आहे की हापूस हेच फळ निर्यात होऊ शकते आणि त्यात थोडेफार तथ्य आहेच. देवगड, रत्नागिरीमध्ये जांभा दगडावर रुजलेला हापूस स्वादाला उत्कृष्ट असतो. म्हणूनच तो सर्व निर्यात होतो, पण त्याच हापूसच्या तोडीस तोड भारताच्या इतर राज्यांत सुद्धा उत्कृष्ट प्रकारचे आंबे आहेत. देशांतर्गत गरज भागवून त्यांची सुद्धा निर्यात वारी होणे गरजेचे आहे. त्यासाठी आंबा निर्यात होणाऱ्या विविध देशांत आपण आपल्या देशामधील निर्यातक्षम वाणांचे आकर्षक प्रदर्शन भरविणे गरजेचे आहे. जागतिक पातळीवरील अशा कृषी प्रदर्शनातून विविध राज्यांमधील उत्कृष्ट दर्जाच्या आंब्यांची ओळख तेथील खरेदीदारांना होणे आवश्यक आहे.

आज एकट्या अमेरिकेत लाखो भारतीय स्थायिक आहेत. या सर्वांनाच आंबा आवडतो; पण त्यांच्या घरात हापूस व्यतिरिक्त इतर भारतीय आंबा आढळतच नाही. त्यांच्या घरामधील लहान मुलांना अल्फान्सो (हापूस) व्यतिरिक्त इतर एकही आंब्याचे नवे वाण माहीत नाहीत. आंब्यासाठी आपले पहिले ग्राहक तेथे राहणारे आपलेच लोक आहेत. या वर्षी भारताने कोरोनाच्या मागील दोन वर्षांच्या कालखंडाच्या तुलनेत आंब्याची सर्वांत जास्त निर्यात केली आहे.



आपल्या आंबा खरेदीमध्ये दक्षिण कोरिया, जपान आणि अर्जेंटिना आघाडीवर होते. विशेष म्हणजे जपानला जास्त आंबा निर्यात झाला आणि याचाच फायदा आपण घ्यावयास हवा. जपानी लोकांना त्यांच्या आहारामधील वैविध्य जास्त आवडते. एकच एक चव सहसा त्यांना आवडत नाही. म्हणून झारखंड, उत्तर प्रदेशमधील आंब्याच्या विविध दर्जेदार जाती या नवीन बाजारपेठेत जाणे गरजेचे आहेत.

भारताची २०२१-२२ मधील आंबा निर्यात ४४ दशलक्ष डॉलरपर्यंत पोहोचली. जी २०१९-२० च्या ५६.११ दशलक्ष डॉलरच्या तुलनेत कमी आहे. कारण अमेरिकेने फळे तपासणीच्या नावाखाली आपली आयात थांबवली होती. आपण ती परीक्षा पास झाल्यामुळे १००० टन हापूस, केसर आणि इतर जाती अमेरिकेस रवाना झाल्या, पण आता आपण जपान आणि अर्जेंटिनाची बाजारपेठ काबीज करणे जास्त महत्त्वाचे आहे.

यासाठी प्रत्येक राज्यामधील आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे मजबूत जाळे निर्माण होणे आवश्यक आहे. निर्यात आंबा म्हणजे हापूस आणि नंतर केसर असे समजून चालणार नाही. आपले इतर ब्रॅण्डसुद्धा पुढे येणे गरजेचे आहे. यासाठी परराष्ट्र मंत्रालय आणि वाणिज्य मंत्रालयांनी एकत्र येऊन पुढील हंगामासाठी आत्तापासूनच काम करणे महत्त्वाचे आहे. राज्य सरकारच्या मदतीने आंबा उत्पादक शेतकऱ्यांचा शोध घेणे ही आवश्यक आहे. दुबई, डेन्मार्क, तुर्की आणि जर्मनीमधील आंबा उत्पादन प्रक्रिया आणि तयार उत्पादन निर्यात करणाऱ्या संघटनेबरोबर आपले संबंध जास्त फायद्याचे ठरू शकतात. आंबा फळ ताज्या अवस्थेत भारत आणि पाकिस्तानमधून पश्चिम आशियामधील अनेक राष्ट्रांना निर्यात होते तर दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांची बाजारपेठ फिलिपिन्स आणि थायलंडने काबीज केली आहे. दक्षिण पूर्व आशियात आपला आंबा पोहोचणे गरजेचे आहे. त्यासाठी वातानुकूलित कंटेनर जे समुद्री मार्गे जातात त्यांची निर्मिती आपल्या देशात प्राधान्याने होणे ही काळाची गरज आहे. असे झाल्यास आपली निर्यात वेगाने वाढू शकते.

आज आपल्या देशात एक हजार पेक्षाही जास्त प्रकारच्या आंब्याच्या जाती आहेत. त्यातील फक्त ३० जातींनाच व्यापारी महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यातील ५० टक्क्यांपेक्षाही जास्त हिस्सा एकट्या हापूसचा आहे. यात बदल होणे गरजेचे आहे. झारखंडमध्ये नाबार्डच्या आर्थिक मदतीने उभ्या राहिलेल्या विविध आंब्याच्या शेकडो बागा मी पाहिल्या. ज्या आंबा वाणांची नावे सुद्धा मी कधी ऐकली नव्हती आणि चवीला ते आंबे हापूसपेक्षा कितीतरी पटीने उत्कृष्ट होते. आपण चाखत असलेली हीच चव विदेशी लोकांच्या ओठावर उतरली तर आपल्या आंबा निर्यातीस प्रचंड मोठे बळ मिळू शकले आणि ठरावीक व्यापारी आंबा जातींवरील आपले अवलंबित्व कमीही होऊ शकते. त्यामुळे लाखो शेतकऱ्यांना फळ निर्यातीच्या मुख्य प्रवाहात आणणे सुद्धा शक्य होऊ शकते. आज आपला निर्यातक्षम हापूस आंबा वातावरण बदलाच्या ताणतणावामधून जात आहे. अवेळी पडणारा पाऊस, थंडीचे कमी होणारे प्रमाण, विविध प्रकारच्या किडीमुळे सुद्धा आज हे फळ संकटात सापडत आहे. त्याचे उत्पादनही कमी होत आहे. त्याचा फटका आंबा निर्यातीलाही बसत आहे. हापूसचा सन्मान राखत आपले दशहरी, आम्रपाली, सफेदा, राटावूल (Rataul) यांनी देशाबाहेर पाऊल ठेवणे आवश्यक आहे. असे झाल्यास देशातील खासकरून झारखंडमधील आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादनास बळकटी मिळेल. त्यांचे अर्थशास्त्र सुधारेल.

**(लेखक शेती प्रश्नांचे अभ्यासक आहेत.)**

Agrowon Dt. 11/11/2022

# संत्रा निर्यातीसाठी सवलतींची गरज

## 'मॅग्नेट' प्रकल्प समितीसमोर संत्रा उत्पादक साखळीतील तज्ज्ञांचा संवाद

विनोद इंगोले : ॲग्रोवन वृत्तसेवा

**संत्रा निर्यातीला चालना मिळावी याकरिता मॅग्नेट प्रकल्पात एक कंपनी नेमली आहे. या कंपनीने संत्रा उत्पादनाशी संबंधित सात लाख टन उत्पादकता राज्याची आहे. त्यातील दोन लाख टन संत्राच बांगलादेशला निर्यात होतो. आयातशुल्क वाढीमुळे त्यालाही मर्यादा आल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर निर्यातीला चालना मिळावी याकरिता पणन मंडळाने स्थापन केलेल्या अभ्यास समितीसमोर विविध मुद्दे मांडण्यात आले. परंतु त्याकरिता सुरुवातीला संत्रा प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर सवलती देण्याची गरज आहे. शेतकऱ्यांचा प्रतिसाद वाढल्यानंतर या सवलतींमध्ये कपात करता येईल.**

– **श्रीधर ठाकरे,** कार्यकारी संचालक, महाऑरेंज

नागपूर : विदर्भातून संत्रा निर्यातीला प्रोत्साहन मिळावे याकरिता पहिल्या टप्प्यात पणन मंडळाकडून निर्यात सुविधा सवलतीत पुरविण्यात आल्या पाहिजे. त्यानंतर शेतकऱ्यांकडून निर्यात वाढल्यास हे अनुदान किंवा सवलतींमध्ये कपातीचे धोरण असावे, अशा प्रकारची मांडणी महाऑरेंजसह निर्यातदार व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी केली.

संत्रा निर्यातीला प्रोत्साहन मिळावे याकरिता अभ्यासासाठी एका कंपनीची नियुक्ती पणन मंडळाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'मॅग्नेट' (महाराष्ट्र ॲग्री बिजनेस नेटवर्क प्रोजेक्ट) प्रकल्पस्तरावरून करण्यात आली आहे. ही समिती संत्रा निर्यातीसंदर्भात विविध घटकांशी चर्चा करून तसेच बाजाराच्या अभ्यासाअंती आपला अहवाल देणार आहे. या अभ्यास समितीने महाऑरेंजचे कार्यकारी संचालक श्रीधर ठाकरे, मनोज जवंजाळ, सुधीर जगताप, निर्यातदार प्रवीण वानखडे, ताजू खान, रमेश जिचकार यांच्याशी संवाद साधला. या वेळी श्रीधर ठाकरे यांनी विविध अभ्यासपूर्ण मुद्दे मांडले. मुंबई ते नागपूर असा संत्रा कंटेनर पाठविण्याचा खर्च ७० हजार रुपयांचा खर्च होतो. परिणामी, निर्यातीला खरंच चालना मिळावी, असे वाटत असेल तर कंटेनरची उपलब्धता अनुदानावर झाली पाहिजे.



निर्यातीमध्ये ग्रेडिंग, कोटिंग आणि आकर्षक बॉक्स पॅकिंग या सर्व बाबींचे महत्त्व आहे. या सुविधा देखील सवलतीत किंवा पहिल्या टप्प्यात निःशुल्क मिळाल्या तर येत्या काळात त्याला शेतकऱ्यांचा प्रतिसाद वाढता राहील. त्यामुळे निर्यातीला चालना मिळण्यास मदत होणार आहे. संत्र्याची मागणी असलेल्या नवीन देशांचा शोध घेणे, नवे निर्यातदार तयार करण्याकरिता देखील पणनस्तरावरुन प्रयत्न होणे अपेक्षित असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

Agrowon Dt. 10/11/2022

# 'मॅग्नेट'च्या दुसऱ्या टप्प्यात शेतीमालाच्या प्रक्रियेला स्थान

## एशियन डेव्हलपमेंट बँकेचे संचालक अजयकुमार खरे यांची माहिती

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नागपूर : महाराष्ट्र ॲग्री बिजनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पांतर्गत राज्यातील ११ उत्पादन पिकांचा समावेश करण्यात आला आहे. या पिकाच्या मूल्यसाखळीमध्ये खासगी गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्देश आहे. पुढील काळात या प्रकल्पात प्रक्रियेला देखील प्राधान्य दिले जाईल, अशी माहिती एशियन डेव्हलपमेंट बँकेचे भारतातील कार्यकारी संचालक समीर कुमार खरे यांनी दिली.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) नागपूरमध्ये आयोजित मॅग्नेट प्रकल्पाचे आढावा बैठकीत ते बोलत होते. एशियन डेव्हलपमेंट बँकेचे कार्यकारी संचालक चॅटिल ओंग, सर्गोलो लुगार्सी, टोकियो कोनिशी, अनुप कुमार, आयआयआयएमचे संचालक भिमार्या मैत्री, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, मॅग्नेटचे नागपूर विभागीय प्रकल्प संचालक अजय कडू यांची यावेळी उपस्थिती होती.

समीर कुमार खरे पुढे म्हणाले, राज्यातील डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची (हिरवी व लाल) व फुले या प्रमुख अकरा फलोत्पादन पिकांचा समावेश मॅग्नेट प्रकल्पात केला आहे. पहिल्या टप्प्यात उत्पादन पिकाच्या मूल्य साखळ्यांमध्ये खासगी गुंतवणूक आकर्षित करून शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ करण्याचा उद्देश आहे. फळे व भाजीपाल्यांचे काढणी पश्चात नुकसान कमी करणे व त्यांची साठवणूक क्षमता वाढविणे, मागणीनुसार मालाची मूल्यवृद्धी करणे आणि वितरण व्यवस्था कार्यक्षम करणे या बाबींचा समावेश आहे. एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या निधीतून हा प्रकल्प राबविला जात आहे. पहिल्या टप्प्यात उद्योजक, शेतकरी कंपन्या तसेच फळ व भाजीपाला उत्पादक संघाचा याला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यानंतर प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात या शेतीमालाच्या प्रक्रियेला देखील स्थान देण्यात आले आहे. एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या संचालक मंडळासमोर या प्रकल्पाचे अंमलबजावणीचा राज्यस्तरीय आढावा मांडता यावा याकरिता आयआयएम नागपूर येथे ही बैठक घेण्यात आली.

### दुसरी आढावा बैठक नागपूरमध्ये

एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या कार्यकारी संचालकांनी या वेळी शेतकऱ्यांना प्रकल्पाची अंमलबजावणी संदर्भात येत असलेल्या अडचणी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून जाणून घेतल्या. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणी संदर्भातील दुसरी आढावा बैठक नागपूर येथे डिसेंबर अखेर किंवा जानेवारी घेतली जाईल, अशी घोषणा देखील या वेळी करण्यात आली.

Agrowon Dt. 07/11/2022

# शेतमाल बाजारातील उलाढाल ७५ हजार कोटींवर

## पणन संचालक सुनील पवार यांची माहिती; कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील उलाढाल ६० हजार कोटींवर

पुणे : पुढारी वृत्तसेवा



**राज्यात कार्यरत असलेल्या ३०७ कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये गतवर्ष २०२१-२२ मध्ये सुमारे ६० हजार कोटी रुपये आणि थेट पणन परवाना, एकल परवाना आणि खासगी बाजारांमध्ये मिळून सुमारे १२ ते १५ हजार कोटींची वार्षिक उलाढाल झाली आहे. त्यामुळे गतवर्षी शेतमाल बाजारव्यवस्थेतील एकूण उलाढाल सुमारे ७५ हजार कोटी रुपयांवर पोहचल्याची माहिती पणन संचालक सुनील पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.**



**गतवर्षी बाजार व्यवस्थेअंतर्गत शेतमालाची झालेली वार्षिक उलाढाल.**

| क्र. : | आर्थिक वर्ष | परवाना पध्दत व संख्या | झालेली उलाढाल |
|---|---|---|---|
| १. | २०२१-२२ | थेट परवाना -१४६० | १,३६८ कोटी |
| २. | २०२१-२२ | एकल परवाना -३३ | ५,५६३.१७ कोटी |
| ३. | २०२१-२२ | खासगी बाजार- ७३ | ४,५५५.८४ कोटी |
| ४. | २०२१-२२ | बाजार समित्या -३०७ | ६०,००० कोटी |

शेतकऱ्यांना बाजार सुविधा पर्याय निर्माण झाल्यामुळे स्पर्धा वाढून शेतमालास वाजवी दर आणि बाजार समित्यांच्या कामकाजातही सुधारणा झाल्याचे नमूद करून ते म्हणाले, महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मध्ये सन २००५ मध्ये सुधारणा करण्यात आली. त्याअन्वये कृषी उत्पन्न बाजार समित्यांशिवाय थेट पणन, एकल परवाना, खासगी बाजार सुरू करण्यासाठी तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या. शेतकऱ्यांकडील कृषी उत्पन्नाची थेट खरेदी करण्यासाठी विविध व्यक्ती, कंपन्या, संस्था, शेतकरी, शेतकरी गट इत्यादींना थेट पणन परवाने पणन संचालनालयामार्फत देण्यात येतात. राज्यात १ हजार ४६० थेट पणन परवानाधारक कार्यरत असून, त्यांनी गतवर्ष २०२१-२२ मध्ये सुमारे १ हजार ३६८ कोटी रुपयांची उलाढाल केलेली आहे. एक किंवा अधिक बाजार आवारांमध्ये शेतमालाची थेट खरेदी करता यावी, यासाठी एकल परवाना (सिंगल लायसेन्स) देण्यात येतो. त्यातून २०२१-२२ मध्ये ३३ परवानाधारकांकडून ५ हजार ५६३ कोटी १७ लाखांची उलाढाल केली आहे.

तसेच पणनव्यवस्थेत बदल करण्यासाठी खासगी निधीची गुंतवणूक करणे व शेतकऱ्यांना पर्यायी व्यवस्था उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून राज्यात सध्या ७३ खासगी बाजार परवानाधारक आहेत. त्यांनी २०२१-२२ मध्ये ४ हजार ५५५ कोटी ८४ लाख रुपयांइतकी उलाढाल केली आहे. काही वस्तूंवर बाजार फी (सेस) नसली तरी चांगली उलाढाल होते आणि हा आकडाही मोठा असल्याचे ते म्हणाले.

दरम्यान, शनिवारी पणन संचालनालयात नाशिक येथील मोहाडी (ता. दिंडोरी) येथील सह्याद्री फार्मर प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड यांना सह्याद्री फार्मर्स प्रायव्हेट ॲग्रिकल्चर मार्केट लिमिटेड या नावाने खासगी परवाना सह्याद्रीचे चेअरमन विलास शिंदे यांना पणन संचालक सुनील पवार यांच्या हस्ते बुधवारी देण्यात आला. या प्रसंगी पणन सहसंचालक विनायक कोकरे, पणन उपसंचालक अविनाश देशमुख, नितीन काळे, डॉ. विवेक भिडे व अन्य अधिकारी उपस्थित होते. राज्यातील शेतकरी उत्पादक कंपनीचा हा पहिलाच खासगी बाजार होणार असल्याचे पवार यांनी पत्रकारांना सांगितले.

Maha.Times Dt. 04/11/2022

# राज्यामध्ये दर वर्षी चार खासगी बाजार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यात दर वर्षी चार ते पाच खासगी कृषी बाजारांची भर पडत असल्याची माहिती पणन संचलनालयाने दिली आहे. त्यामुळे येत्या काळात खासगी बाजारांची संख्या वाढून कृषी उत्पन्न बाजार समित्यांना एक सक्षम पर्याय उभा राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राज्य सरकारने २००५मध्ये कायद्यात बदल करून खासगी कृषी बाजारांना परवाना देण्याचे धोरण अवलंबले. त्यानंतरच्या पाच वर्षांत या परवान्यांसाठी कुणी इच्छुक असल्याचे दिसले नाही. २०१०नंतर मात्र, परवान्यांची संख्या वाढली. एका अर्जदाराने प्रस्ताव सादर केल्यापासून त्याला प्रत्यक्ष परवाना देईपर्यंत दीड ते दोन वर्षांचा कालावधी जातो. संबंधित अर्जदाराकडे किमान ३० वर्षांचा भाडेकरार असलेली किंवा स्व-मालकीची जागा असावी लागते. तेथे शेड, कुंपण, पिण्याचे पाणी, रस्ते, स्वच्छतागृहे, व्यापारी गाळे, प्रशासकीय इमारत आदी व्यवस्था निर्माण करावी लागते.

'अर्जदार जागा आणि इतर आवश्यक कागदपत्रांसह परवान्यासाठी अर्ज करतात. त्या वेळी संबंधित जागेवर किमान सुविधा आवश्यक असतात. प्रस्तावानंतर जागेची पाहणी आणि कागदपत्रांची पडताळणी करून खातरजमा केली जाते. त्यानंतरच अंतिम मान्यता देऊन परवाना दिला जातो,' अशी माहिती पणन संचालक सुनील पवार यांनी दिली.

## मोठ्या जागेचे आव्हान

राज्यात ७४ खासगी कृषी बाजार कार्यान्वित असले, तरीही अद्याप पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या शहरात ते सुरू झालेले नाहीत. महापालिका हद्दीतील लोकसंख्या विचारात घेता, खासगी कृषी बाजारांसाठी दहा एकर जागेचे बंधन घालण्यात आले आहे. मात्र, महापालिका हद्दीत सलग दहा एकर जागा उपलब्ध होणे अशक्य समजले जाते. त्यामुळेच अद्याप मोठ्या शहरांत खासगी बाजार सुरू झालेले नाहीत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# 'सह्याद्री फार्मर'ला मिळाला खासगी बाजाराचा देशातील पहिला परवाना

## पणन संचालक पवार यांच्याकडून अध्यक्ष विलास शिंदे यांना परवाना प्रदान

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : बाजार समित्यांमधील पारंपरिक कायदे आणि व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांची होणारी आर्थिक फसवणूक आणि पिळवणूक टाळण्यासाठी पणन सुधारणांमध्ये खासगी बाजार समित्या उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. याअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या देखील खासगी बाजार समिती उभारू शकतात. या अंतर्गत शेतकरी कंपनीला देशातील पहिली बाजार समिती उभारण्याचा मान मोहाडी (जि.) नाशिकच्या सह्याद्री फार्मर प्रोड्यूसर कंपनीला मिळाला आहे. खासगी बाजार समितीचा परवाना बुधवारी (ता. २) पणन संचालक सुनील पवार यांनी सह्याद्रीचे अध्यक्ष विलास शिंदे यांना प्रदान केला.

या वेळी बोलताना पवार म्हणाले,



**पुणे : पणन संचालनालयाच्या वतीन शेतकरी उत्पादक कंपनीला खासगी बाजार समितीचा देशातील पहिला परवाना पणन संचालक सुनील पवार यांच्या हस्ते नाशिक जिल्ह्यातील मोहाडी येथील सह्याद्री फार्मर प्रोड्यूसर कंपनीचे अध्यक्ष विलास शिंदे यांना बुधवारी (ता. २) प्रदान करण्यात आला. या वेळी डावीकडून, पणन सहसंचालक अविनाश देशमुख, नितीन काळे, विनायक कोकरे, श्री. पवार, श्री. शिंदे आणि विवेक भिडे.**

''शेतीमाल पणन व्यवस्था सुधारणांतर्गत शेतीमाल विक्री व्यवस्थेतील बाजार समित्यांची एकाधिकारशाही कमी करण्यासाठी थेट पणन,

**पान ४ वर »**

Agrowon Dt. 03/11/2022

Agrowon Dt. 03/11/2022

# 'सह्याद्री फार्मर'ला मिळाला खासगी बाजाराचा देशातील पहिला परवाना

» पान १ वरून

एकल परवाना, खासगी बाजार समित्यांचे परवाने देण्याची शासनाची भूमिका आहे. या अंतर्गत राज्यात ७३ खासगी बाजार समित्यांना परवाने देण्यात आले आहेत. मात्र अद्याप शेतकरी उत्पादन कंपनीने स्वतःची खासगी बाजार समिती उभारली नव्हती. यासाठी मोहाडीच्या (जि. नाशिक) सह्याद्री फार्मर प्रोड्यूसर कंपनीने अर्ज केला होता. त्यानुसार त्यांना आज परवाना दिला आहे. यामुळे 'सह्याद्री' खासगी बाजार समिती उभारणारी देशातील पहिली शेतकरी उत्पादक कंपनी ठरली आहे.''

या बाबत 'सह्याद्री'चे अध्यक्ष विलास शिंदे म्हणाले, ''सह्याद्री कंपनी द्राक्ष, टोमॅटोमध्ये कंत्राटी शेती बरोबरच, उत्पादनापासून ते प्रक्रिया आणि निर्यातीमध्ये काम करत आहे. मात्र यामध्ये बाजार समिती म्हणून आम्ही कमी होतो कंपनीच्या सभासदांबरोबच परिसरातील शेतकऱ्यांना पारंपरिक बाजार समितीला पर्याय होऊन, स्पर्धात्मक दर मिळावा यासाठी आम्ही बाजार समिती उभारली आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे.''

**अशी आहे सह्याद्री फार्मर प्रायव्हेट ॲग्री मार्केट लि.**

- कंपनीच्या ११० एकर आवारामधील बाजार समितीसाठी ६ एकर जागा
- बाजार समितीमध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काट्यासह पायाभूत सुविधा
- भविष्यात टप्पाटप्प्यात शेतमाल खरेदी विक्रीचे १०० परवाने देणार
- भविष्यात ऑनलाइन लिलाव सुरू करणार

**स्पेशल कमोडिटी मार्केट होणार**

सह्याद्रीच्या माध्यमातून द्राक्ष, टोमॅटो, बेदाणा आणि सुकामेव्याची विशेष बाजार समिती निर्माण होणार आहे.

**नाशिकमध्ये वाढतेय काजू शेती**

नाशिक जिल्ह्यात सध्या १५ हजार एकरांवर काजूची लागवड झाली असून, भविष्यात काजूसाठी बाजार समितीमध्ये लिलाव होणार असल्याने काजू बरोबर हळद देखील वाढत आहे.

**दृष्टिक्षेपात खासगी बाजार समिती आणि थेट पणन**

- खासगी बाजार समित्या - ७३ - उलाढाल - ४ हजार ५५५ कोटी रुपये
- थेट पणन परवाने - १ हजार ४६० --- उलाढाल १ हजार ३६८ कोटी रुपये
- एकल परवाने - ३३ --- उलाढाल ---५ हजार ५६३ कोटी रुपये

# शेतमाल उलाढाल ७५ हजार कोटींवर

- खासगी बाजार, एक परवान्यांतर्गत १२ हजार कोटींची उलाढाल
- बाजार समित्यांमधील उलाढाल ६० हजार कोटींवर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात कार्यरत असलेल्या ३०७ कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये गतवर्षमध्ये सुमारे ६० हजार कोटी रुपये आणि थेट पणन परवाना, एकल परवाना आणि खासगी बाजारांमध्ये मिळून सुमारे १२ ते १५ हजार कोटींची वार्षिक उलाढाल झाली आहे. त्यामुळे गतवर्षी शेतमाल बाजारव्यवस्थेतील एकूण उलाढाल सुमारे ७५ हजार कोटी रुपयांवर पोहचल्याची माहिती पणन संचालक सुनील पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शेतकऱ्यांना बाजार सुविधा पर्याय निर्माण झाल्यामुळे स्पर्धा वाढून शेतमालास वाजवी दर आणि बाजार समित्यांच्या कामकाजातही सुधारणा झाल्याचे नमूद करून ते म्हणाले, महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मध्ये सन २००५ मध्ये सुधारणा करण्यात आली. त्याअन्वये कृषी उत्पन्न बाजार समित्यांशिवाय थेट पणन, एकल परवाना, खासगी बाजार सुरू करण्यासाठी तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या. शेतकऱ्यांकडील कृषी उत्पन्नाची थेट खरेदी करण्यासाठी विविध व्यक्ती, कंपन्या, संस्था, शेतकरी, शेतकरी गट इत्यादींना थेट पणन परवाने पणन संचालनालयामार्फत देण्यात येतात. दरम्यान, शनिवारी पणन संचालनालयात नाशिक येथील मोहाडी (ता. दिंडोरी) येथील सह्याद्री फार्मर प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड यांना सह्याद्री फार्मर्स प्रायव्हेट ॲग्रिकल्चर मार्केट लिमिटेड या नावाने खासगी परवाना सह्याद्रीचे चेअरमन विलास शिंदे यांना पणन संचालक सुनील पवार यांच्या हस्ते बुधवारी देण्यात आला. या प्रसंगी पणन सहसंचालक विनायक कोकरे, पणन उपसंचालक अविनाश देशमुख, नितीन काळे, डॉ. विवेक भिडे व अन्य अधिकारी उपस्थित होते.

Pudhari Dt. 03/11/2022

Sakal Dt. 03/11/2022

# देशातील पहिली खासगी बाजार समिती नाशिकला

## सह्याद्री शेतकरी उत्पादक कंपनीला पणन संचालकांच्या हस्ते परवाना

**पुणे, ता. २ :** राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांना खासगी बाजार समित्यांची उभारणी करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. यानुसार देशातील पहिल्या शेतकरी उत्पादक कंपनीच्या खासगी बाजार समितीची उभारणी नाशिक जिल्ह्यातील मोहाडी (ता. दिंडोरी) येथील सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनी करणार आहे. राज्याचे पणन संचालक सुनील पवार यांच्या हस्ते बुधवारी (ता. २) पुण्यात या कंपनीला खासगी बाजार समितीचा परवाना प्रदान करण्यात आला. सह्याद्री फार्मर प्रोड्यूसर कंपनीचे अध्यक्ष विलास शिंदे यांच्याकडे हा परवाना सुपूर्द केला गेला.

प्रचलित व्यवस्थेनुसार उभारण्यात आलेल्या आणि सध्या कार्यान्वित कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील पारंपारिक कायदे आणि व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांची होणारी आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी

पान ९ वर »

**सह्याद्री कंपनी द्राक्षे, टोमॅटोमध्ये कंत्राटी शेतीबरोबरच, उत्पादनापासून ते प्रक्रिया आणि निर्यातीमध्ये काम करत आहे. मात्र, यात बाजार समिती म्हणून आम्ही कमी होतो. ती कसर आता भरून निघाली आहे. या खासगी बाजार समितीच्या माध्यमातून कंपनीच्या सभासदांबरोबरच परिसरातील शेतकऱ्यांना पारंपारिक बाजार समितीला पर्याय मिळावा. जेणेकरून त्यांना स्पर्धात्मक दर मिळावा, या उद्देशाने आम्ही ही बाजार समिती उभारली आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना होईल.**

**– विलास शिंदे,** अध्यक्ष, सह्याद्री शेतकरी उत्पादक कंपनी

Sakal Dt. 03/11/2022

# देशातील पहिली खासगी बाजार समिती नाशिकला

» पान १ वरून

सरकारने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार पणनमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. या सुधारणांमध्ये खासगी बाजार समित्या उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. याअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांचा खासगी बाजार समिती उभारण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचेही सुनील पवार यांनी स्पष्ट केले.

पणन संचालक सुनील पवार म्हणाले, ''शेतमाल पणन व्यवस्था सुधारणांतर्गत शेतमाल विक्री व्यवस्थेतील बाजार समित्यांची एकाधिकारशाही कमी करण्यासाठी थेट पणन, एकल परवाना, खासगी बाजार समित्यांचे परवाने देण्याची सरकारची भूमिका आहे.

याअंतर्गत राज्यात ७३ खासगी बाजार समित्यांना परवाने दिले आहेत. मात्र यात आतापर्यंत एकाही शेतकरी उत्पादक कंपनीचा समावेश नव्हता. खासगी बाजार समिती उभारण्यासाठी आतापर्यंत एकाही शेतकरी उत्पादक कंपनीने पुढाकार घेतला नव्हता. मात्र यासाठी मोहाडीच्या (जि.नाशिक) सह्याद्री फार्मर प्रोड्यूसर कंपनीने अर्ज केला होता. त्यानुसार त्यांना परवाना दिला आहे. यामुळे 'सह्याद्री' ही खासगी बाजार समिती उभारणारी देशातील पहिली शेतकरी उत्पादक कंपनी ठरली आहे.''

पुणे, गुरुवार, ३ नोव्हेंबर २०२२

सकाळ अॅग्रोवन

# पुणे बाजार समितीत सेसची ऑनलाइन वसुली

## गळती रोखण्यासाठी प्रशासकांचा पुढाकार; नऊ कोटींनी उत्पन्नात वाढ अपेक्षित

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : पुणे बाजार समितीमधील सेस चोरीचे रॅकेट मोडीत काढण्यासाठी आणि सेस गळती रोखत उत्पन्न वाढविण्यासाठी गाळ्यावरच ऑनलाइन सेस वसुली सुविधा बाजार समितीने सुरू केली आहे; मात्र यास आडत्यांनी थंड प्रतिसाद दिला आहे. सेस दररोज भरण्यासाठी टप्प्याटप्प्याने सक्ती केली जाणार असून प्रतिसाद न देणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

यावाबत प्रशासक मधुकांत गरड म्हणाले, की बाजार समितीमध्ये आडते वार्षिक उलाढालीवर मार्चअखेरला सेस भरत होते; मात्र गेल्यावर्षीपासून सेस भरण्याच्या विलंबावर १२ टक्के व्याजाची दंडात्मक कारवाई करत, महिन्याला सेस भरण्याचा नियम केला होता. या कारवाईमुळे समितीचे उत्पन्न सुमारे ६०



लाख रुपयांनी वाढले. गेल्यावर्षी (२०२१-२२) ५१ कोटींचे उत्पन्न मिळाले होते, ते यावर्षी ६० कोटींपर्यंत वाढविण्यासाठी दैनंदिन ऑनलाइन सेस भरण्याची यंत्रणा उभारण्यात आली. यासाठी आडत्यांना ऑनलाइन लिंक देण्यात आली असून, तोलणारांच्या आवक नोंदीनुसार सेस आकारणी केली जाणार आहे. ऑनलाइन लिंकमुळे गाळ्यावर बसूनच काही सेकंदामध्ये सेस भरणा होणार आहे.

बाजार समितीच्या गुलटेकडी या मुख्य आवारातील फळे, भाजीपाला, गूळ, भुसार, फुलांचा बाजारासह मोशी उपबाजार येथे ही सुविधा सुरू केली आहे. अचूक हिशेब व जलद व्यवहारासाठी समितीने गेट वे पेमेंटची प्रणाली राबविण्याचा निर्णय घेतला आहे, असेही गरड यांनी सांगितले.

“ बाजार समितीच्या पारंपरिक व्यवस्थेमध्ये आडते दरवर्षी मार्चअखेर दरम्यान वार्षिक उलाढालीवर सेस भरणा करत होते. यामध्ये सेस गळतीचे प्रकार होत होते. हे टाळण्यासाठी दैनंदिन व्यवहारांवर सेस भरण्यासाठी बाजार समितीच्या प्रवेशद्वारावर सेस भरण्याची व्यवस्था नुकतीच सुरू केली आहे. टप्प्याटप्प्याने दैनंदिन सेस भरण्याची सक्ती केली जाणार आहे. जे आडते भरणार नाहीत त्यांचे प्रबोधन करून, नंतर दंडात्मक कारवाई केली जाईल. येत्या दोन महिन्यांत यंत्रणेचा वापर शंभर टक्के होईल.

– **मधुकांत गरड,** प्रशासक, बाजार समिती, पुणे.

“ ऑनलाइन दैनंदिन सेस संकलनाबाबत बाजार समिती प्रशासनासोबत चर्चा झाली आहे. ऑनलाइन पैसे भरण्यासाठी सुविधा गाळ्यावरच उपलब्ध होणार आहे. हे चांगले आहे; मात्र अद्याप ही यंत्रणा वेगाने कार्यरत झालेली नाही. तसेच आम्ही पारंपरिक सेस संकलनासाठी दरवर्षी हिशेब पट्ट्या आणि बिले बाजार समितीला कशाप्रकारे सादर करायचे याबाबत संभ्रमावस्था आहे. याबद्दलचा संभ्रम दूर झाल्यास ऑनलाइन सेस भरण्याचे आम्ही स्वागत करतो.

– **बापू भोसले,** अध्यक्ष आडते असोसिएशन, पुणे बाजार समिती.

Agrowon Dt. 01/11/2022

# 'मॅग्नेट'चे आकर्षण

**मॅग्नेटमुळे पेरू, सीताफळ, मोसंबी, चिकू यांची रस्त्यावरून टोपल्यात किंवा गाड्यावर विकायची फळपिके म्हणून असलेली ओळख पुसली गेली पाहिजेत.**

आपल्या देशात काढणीपश्चात सेवासुविधा उपलब्ध नसल्याने शेतीमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यांत शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसतो. त्यामुळे उत्पादन तसेच दर्जा वाढविण्याबरोबर मूल्यसाखळीतील पायाभूत सुविधांच्या उभारणीतून शेतीमाल स्थानिक ते जागतिक बाजारपेठेत पोहोचला पाहिजे, अशा व्यापक हेतूने आशियाई विकास बँकेमार्फत महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) हा पथदर्शी प्रकल्प राज्यात राबविण्यात येत आहे. हा प्रकल्प अकराशे कोटींचा आहे. मॅग्नेटचा कालावधी सहा वर्षांचा असून तो २०२६-२७ पर्यंत चालू राहील. या प्रकल्पांत ११ पिकांचा समावेश करण्यात आला असून यांत द्राक्ष, आंबा ही फळपिके जाणीवपूर्वक टाळण्यात आली आहेत. त्याऐवजी मूल्यसाखळी विकसित न झालेली डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी भाजीपाल्यामध्ये भेंडी, मिरची तसेच फुलपिकांचा समावेश करण्यात आला आहे. लाभार्थ्यांमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि खासगी उद्योजक आहेत. दुर्दैवाने या प्रकल्पात सहकारी संस्था पुढे येताना दिसत नाहीत. राज्यात शेतकरी उत्पादक कंपन्यांची (एफपीसी) संख्या अधिक आहे. मॅग्नेटमध्ये सहभागासाठी एफपीसी मोठ्या संख्येने पुढेही येत आहेत. अशावेळी प्रकल्पासाठी योग्य एफपीसींची निवड होईल, ही काळजी यंत्रणेने घेतली पाहिजे. पथदर्शी प्रकल्पात अथवा शासकीय योजनांत खासगी उद्योजकांना सहसा स्थान नसते. मॅग्नेटमध्ये खासगी उद्योजकही लाभार्थी असल्याने या संधीचे त्यांनी सोने करायला पाहिजे.

मूल्यसाखळी विकासात शीतगृहांसारख्या पायाभूत सुविधा, प्राथमिक प्रक्रिया, वाहतूक व्यवस्था आहे. अर्थात शेतीमालाचे संवर्धन करीत उत्पादक ते ग्राहक असा तो पोहोचवायचा आहे. यामध्ये १० कोटींपर्यंत प्रकल्पांतर्गत अर्थसाह्य मिळू शकते. त्यात सहा कोटींपर्यंत (६० टक्के) अनुदान आहे. त्यानंतर २० टक्के लाभार्थ्यांचे भागभांडवल तर उर्वरित २० टक्के निधी बँकांकडून कर्ज रूपात मिळणार आहे. अस्तित्वात असलेल्या सुविधांचे नूतनीकरण तसेच शेतकऱ्यांना प्रशिक्षणासाठी सुद्धा प्रकल्पांतर्गत अर्थसाह्य मिळणार आहे. मॅग्नेटमध्ये पणनसह महिला व बालकल्याण असे दोनच नियंत्रणात्मक विभाग असल्याने निर्णय पटकन होऊन प्रकल्पाने चांगली गतीही घेतली आहे. अजून एक चांगली बाब म्हणजे आशियाई विकास बँक या प्रकल्पात महिलांचा अधिकाधिक सहभाग कसा राहील, हेही पाहते. मॅग्नेट प्रकल्पासाठी ट्रस्ट ॲक्टखाली स्वतंत्र संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेमार्फतच प्रकल्पावर देखरेख ठेवली जाते. राज्याच्या मुख्य सचिवांकडे समितीद्वारे प्रकल्पाच्या आढाव्याचे काम आहे. ही सर्व यंत्रणा प्रकल्प अंमलबजावणीस हातभार लावत आहे. अशी प्रकल्पाची संरचना असल्यामुळे प्रक्रिया-विक्री-निर्यातीच्या अनुषंगाने दुर्लक्षित फळपिकांचा व्यावसायिक विकास होण्यास हातभारच लागेल. या प्रकल्पामुळे पेरू, सीताफळ, मोसंबी, चिकू यांची रस्त्यावरून टोपल्यात किंवा गाड्यावर विकायची फळपिके म्हणून असलेली ओळख पुसली गेली पाहिजेत. त्यावर प्रक्रिया होऊन तसेच निर्यातीतून या पिकांना योग्य ती प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम या प्रकल्पाने झाले पाहिजेत. मॅग्नेटच्या सर्वच लाभार्थ्यांनी केवळ अनुदानासाठी हा प्रकल्प राबवू नये. प्रकल्पांतर्गत पिके आपल्या भागात होत असतील तरच यात सहभागी व्हावे. असे झाले तरच यातून उभारलेल्या पायाभूत सुविधांचा प्रकल्प कालावधीनंतरही उपयोग होईल अन्यथा अशा सुविधा पडून राहतील. महत्त्वाचे म्हणजे यातून जो लाभ होणार आहे, तो सभासद शेतकऱ्यांपर्यंत पोहोचायला हवा. पथदर्शी प्रकल्पांचा उद्देशच नवनवे आदर्श घालून देणे, हा असतो. मॅग्नेटद्वारे सुद्धा यात समाविष्ट पिकांची प्रक्रिया, शीतसाठवण, विक्री, निर्यात यामध्ये आदर्शवत अशी कामे झाली पाहिजेत. असे झाले तरच केवळ प्रकल्प कालावधीपर्यंत मॅग्नेटचे आकर्षण राहणार नाही तर कालावधी संपल्यानंतरही याला चिकटून सर्व घटक राहतील.